Volume-7 (2026)
Special Issue-2 (March)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनातील स्त्री प्रतिमा

**रंजना पंजाबराव खरपुरिया**
संशोधक विद्यार्थी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
Email : kharpuriyaranjana@gmail.com.
Mob.No.7083465587

**प्रा. डॉ. अशोक भारत भक्ते**
मार्गदर्शक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रा. डॉ. शैलेंद्र धर्मदास लेंडे**
संशोधन केंद्रप्रमुख
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.128

---

***सारांश :***

*भटक्या विमुक्तांना कलावंताचा समाज म्हणून ओळखला जातो. हा समाज संपूर्ण भारतभर विखुरलेला आहे.पोटाची भूक भागविण्यासाठी भटकंती करून गावोगावी आपली कला सादर करणे तसेच इतर कामे करणे हीच त्यांची उदरनिर्वाहाची साधने आहे. 'ना घर, ना दार, उचलली पाल, दुसऱ्या गावाकडे चाल.' याप्रमाणे हा समाज दिसून येतो. त्यामुळे एका ठिकाणी स्थायिक नसल्याकारणाने या समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण अल्प प्रमाणात आहे. स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे पारंपरिक चौकटी मोडून गरिबी व विस्थापन नाकारून अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे एक मोठे बंड आहे.*

*भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनामध्ये उपराकार लक्ष्मण माने यांनी आपल्या आईच्या कष्टमय आणि वेदना पूर्ण संघर्षमय जीवनाचे चित्रण रेखाटलेले आहे. तर काही आत्मकथनामध्ये स्त्री ही कुटुंबाचा मुख्य आधारस्तंभ म्हणून कुटुंबासाठी भीक मागण्याचे काम करते. मजुरी करणे, जनावरे सांभाळणे किंवा पारंपरिक व्यवसाय करणे अशा कामात गुंतलेली दिसते. या समाजातील स्त्रियांना केवळ आर्थिक, सामाजिक आणि लैंगिक शोषणालाही सामोरे जावे लागते. समाजातील उच्चवर्गीय लोकांकडून त्यांच्यावर अन्याय होतो त्या अन्यायाचा प्रतिकार त्या आपल्या वेदनांना लपवून कशा करतात याचे चित्रण आलेले आहे. 'कोल्हाट्याचं पोर' आत्मकथनात कोल्हाटी समाजातील स्त्रियांचे नाचगाण्याशी जोडलेले जीवन आणि त्यातून होणारे शोषण प्रभावीपणे लेखकाने मांडलेले आहे. काही आत्मकथनामध्ये स्त्रिया अंधश्रद्धा, रूढी, परंपरांच्या जाळ्यात अडकलेल्या दिसून येतात. त्यांना शिक्षणाचा गंध नसल्यामुळे त्या परंपरांना विरोध करू शकत नाही तर काही आत्मकथनामध्ये स्त्री ही केवळ एक पीडित नाही, तर संघर्ष करणारी, परिस्थितीशी झुंज देणारी आणि कुटुंबाला उभे करणारी व्यक्ती म्हणूनही पाहायला मिळते. ती कठीण परिस्थितीतही धैर्याने जगते आणि आपल्या कुटुंबासाठी संघर्ष करताना दिसते. शिक्षणामुळे स्त्रियांच्या जीवनात होणारा बदलही मोठ्या प्रमाणात दिसून येतो.*

*अशाच भटक्या विमुक्त समाजात झालेल्या लेखिका विमल मोरे तसेच जनाबाई गिऱ्हे यांचा देखील उल्लेख केला जातो. त्यांनी परिस्थितीशी कशी झुंज दिली आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही उपेक्षित राहून सामाजिक परंपरांना झुगारून आपले शिक्षण कसे पूर्ण केले. स्वतःच्या समाजाने टाकलेल्या बहिष्कारचा सामना करावा लागला तरी त्यांनी संघर्ष सुरू ठेवला आणि आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी आपल्या आत्मकथनामध्ये स्वतःबरोबर समाजातील स्त्रियांच्या जीवनातील अन्याय, अनंत यातना, दडपण, समाजाकडून लादलेले निर्बंध आणि सततची उपेक्षा आणि एक स्त्री म्हणून सहन करावा लागणारा संघर्ष चित्रित केला आहे. या लेखाच्या अनुषंगाने भटक्या विमुक्त स्त्रियांच्या कष्टमय संघर्षपूर्ण जीवनपट रेखाटण्याचा अल्पसा प्रयत्न आहे.*

**बीज शब्द :** भटका, वेदना, यातना, गरिबी, दारिद्र्य, भूक, जात, लिंग, वनवन, सामाजिक दडपण, शिक्षणासाठी संघर्ष.

---

**प्रस्तावना :**

मानवी जीवनात स्त्रीचे स्थान लाखो वर्षांपूर्वी मातृसत्ताक समाज संस्थेनुसार सर्वोच्च होते. जगात आणि भारतात सुमारे इ. स.पूर्व तीन हजार वर्षापर्यंत मातृसत्ताक समाजसंस्था अस्तित्वात होती असे आढळते. मानवी संस्कृतीची वाटचाल मातृप्रधान समाज, पितृप्रदान समाज व पुढे पुरुषप्रधान समाज या मार्गाने झालेली आहे. मातृप्रधान समाजात स्त्रीपुरुष सहजभाव परस्पर पुरकता या गोष्टीचे अस्तित्व होते पण पितृप्रधान समाजात त्या गोष्टींना किंमत राहिली नाही. त्यातून पुरुषप्रधान समाज निर्माण झाला. स्त्री स्वावलंबी असलेली हळूहळू पुरुषप्रधान समाज रचनेत गुलाम झाली. मानवी संस्कृतीमधील स्त्रीच्या जीवनाप्रमाणे हे स्थित्यंतर तिच्या जीवनाला फार वेगळ्या दिशांनी नेल्यास कारणीभूत झाले.

जन्माला आलेली प्रत्येक स्त्री ती कोणत्याही जाती, धर्म, समाजाची असो तिला स्त्री जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, सासू अश्या वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. धर्मग्रंथांनी स्त्रीला लहानपणी वडिलांच्या छत्रछायेत, तरुणपणी पतीच्या छत्रछायेत , म्हातारपणी मुलाच्या छत्रछायेत आपले आयुष्य घालवावे असे नमूद केले आहे. ते एका अर्थाने या धर्मग्रंथांच्या माध्यमातून स्त्री स्वातंत्र्याला नाकारण्याचे षडयंत्र आहे. स्त्रीने पुरुषाच्या कुटुंबासाठी स्वतःचे अस्तित्व विसरून दुसऱ्याची सेवा-सुश्रुषा करणे, त्याग करणे यात आपले आयुष्य खर्च करावे अशी समजूत आजही विविध पातळीवर पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत दिसून येते. अशा भटक्या विमुक्त समाजातील स्त्रियांचे जीवन अत्यंत संघर्षपूर्ण, अस्थिर आणि सामाजिक आर्थिक विषमतेने भरलेले आहे . अन्नाच्या शोधात सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करावी लागत असल्याने या स्त्रियांना कायमस्वरूपी निवारा, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा पासून वंचित राहावे लागते. भारतीय समाजव्यवस्थेत मुस्लिम स्त्री असो आदिवासी असो किंवा भटक्या विमुक्त जाती जमाती मधील स्त्री असो तिचे दुःख तर अतिशय भयावह आहे.

भटका विमुक्त समाज हा भारतीय सामाजिक रचनेतील अत्यंत उपेक्षित वंचित आणि मुख्य प्रवाहापासून

दूर राहिलेला घटक आहे. ऐतिहासिकदृष्ट्या या समाजाला ब्रिटिश सत्तेने गुन्हेगार जमाती म्हणून घोषित केले होते. त्यामुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनावर खोल परिणाम झाला. स्वातंत्र्यानंतर त्यांना "विमुक्त" हा दर्जा मिळाला असला तरी सामाजिक कलंक, गरिबी, अशिक्षण आणि असुरक्षितता यांचा त्यांच्या जीवनावर आजही परिणाम दिसून येतो. या पार्श्वभूमीवर भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनामध्ये त्यांच्या जीवनातील वास्तवांचे जिवंत आणि हृदयस्पर्शी चित्रण आढळते. विशेषत: या आत्मकथनांमधील स्त्री प्रतिमाही त्यांच्या संघर्षमय जीवनाचे प्रभावी दर्शन घडवते.

**विषय विवेचन :**

भटक्या विमुक्त समाजातील स्त्रियांना प्रस्थापित समाज व्यवस्थेने दुय्यम लेखून अन्याय, अत्याचारकरून गुलाम केले. स्त्री म्हणजे पुरुषाची दासी, गुलाम ती निर्बुद्ध व निर्जीव वस्तू समजून तिला समाजव्यवस्था वागवीत असल्याचे पुरावे भटक्यांच्या आत्मकथनात येतात. 'चूल आणि मूल' अन्याय आणि अत्याचार सहन करण्यासाठीच तिचा जन्म झाला आहे असे मत असल्याने सतत तिची पिळवणूक होत राहिली आहे. तिचे आयुष्य म्हणजे कुटुंबाला समर्पित असल्याचे जाणवते. भटक्या समाजाची स्त्री मात्र सर्वांची काळजी करणारी, आपल्या मुलाबाळांना जपणारी, माणसाच्या सुखात सुखी होणारी, अहोरात्र कष्ट करणारी, शोषित मनाची स्त्री आहे. पुरुषांच्या बरोबरीने राबते. स्वतः झिजवून दुसऱ्याला हिम्मत देणारी आहे. पावलोपावली तिच्या कष्टमय जीवनाचा संघर्षमय इतिहास भटक्यांच्या आत्मकथनातील पानापानातून सुगंधित फुलांनी बहरलेला आहे. उपराकार लक्ष्मण मानेची आई गाढवावर आपला संसार लादून गाडगी, मडकी, जमली, भनुगे आणि आपली मुले बसवून गावोगाव भटकणाऱ्या कैकाडी समाजाची आहे. मुलांच्या पोटासाठी गावात भीक मांगून शिळेपाळे आणते.नवऱ्याच्या कामात मदत करते.आपला मुलगा शिकावा, मोठा साहेब व्हावा म्हणून दिवस-रात्र धडपडते. वारंवार नवऱ्याचा मार खाते. शिव्यांचा वर्षाव होतो. गावकुसाबाहेर हागणदारीत पाल ताणून टाकते आणि अवतीभवती तीन दगडाची चूल मांडून तिच्यावर भाकरी थापून जगणारी स्त्री पाहायला मिळते. वेळप्रसंगी मिळेल त्या अन्नावर पोट भरते. तर वेळप्रसंगी उपाशी तापाशी राहून संसाराचा गाडा ओढत राहते. पारू मामीचं झोपेत तोंड बांधून व तिला उचलून नेऊन कोणीतरी दोघाचौघांनी तिच्यावर बळजबरीने बलात्कार केला. धर्माकडे कैकाडी आपल्या बायकोला अडीचशे रुपयात गहाण ठेवतो. "माझी बायको धर्म्याकडे चार वर्षे झाली गहाण ठेवलीया त्यानं पन्नास रुपये पाच वेळा दिले. मी चार वर्षात मागारी देता म्हणाला. आता मी पैसे देतोया पर हयो माझी बायको मागारी दीना झालाय."[१] कैकाडी समाजात स्त्रीला गहाण ठेवल्या जाते.यावरून तिचे आपल्या समाजात असलेले स्थान किती हिनत्व दर्जाचे आहे असे दिसून येते.

शिक्षण घेणे म्हणजेच पाप आहे अशा शिक्षणापासून वंचित राहून रानोमाळ भटकणाऱ्या एका भटक्या स्त्रीच्या जीवनाची गाथा मांडणाऱ्या जनाबाई गिऱ्हेचे आयुष्य मरणकळयातून फुललेले दिसते. जनाबाईच्या 'मरणकळा' त्यांच्याच नाही तर संपूर्ण गोपाळ समाजातील स्त्रियांचा मरणासन्न, यातनामय जीवनाचा प्रवास आहे. कठोरपेक्षा कठोर दगडालाही पाझर फुटावा अशा पद्धतीचे गोपाळ स्त्रियांचे जीवन जगणे होय. दारिद्र्याने ग्रासलेल्या, अज्ञानाने पिछाडलेल्या, पावलोपावली अंधश्रद्धा, अन्याय, अत्याचार यांचा या समाजात प्रचंड

प्रमाणात प्रभाव दिसून येतो. गावकुसाबाहेर पालावर बसणाऱ्या स्त्रीचे दुःख, शोषण आपला समाज व उच्चभ्रू समजणारा समाज कसा करतो याची ओळख होते. भूक व भाकरीच्या अवतीभवती फिरणारी स्त्री जेव्हा स्वतःच्या शिक्षणाची भूक भागविण्यासाठी घराबाहेर पडते तेव्हा स्वतःचा समाज तिला "बस झालं तोह शिक्षण!पुढे चालून आमच्या तोंडाला काळ लावशील. आमाला जगात हिंडायला नाक नाही ऱ्हायचं. जर आमचं आयकनार नसाल तर तुझ्या बाच पाल आमी निराळ टाकू."[२] असे जात पंचायतीचे लोक म्हणतात. वितभर पोटाची भूक व्यक्तीला काहीही करायला भाग पाडते. जनाबाईचे वडील आंधळ्याचे सोंग घेऊन भीक मागते. आणि जनाबाई बापाचं बोट पकडते. आता जेवावे म्हणून बाप गाठोडे सोडतो तेव्हा एक कुत्रा त्याचा चावा घेतो त्यामुळे अन्न पोटात जाऊ शकले नाही. अशी खंत त्या व्यक्त करतात.स्त्रियांनी शिक्षण घेऊ नये घेतले तर पाप समजल्या जाते. स्वतःची आजी शिक्षण घेण्याला विरोध करते आणि म्हणते. "ओ-यो काय रं बया बगलातून काढतुया आन पुढ मांडतुया ! पोर म्हशी वळतिया, घासकुटका मागतिया अन् हे सोडून हे काय भलतंच करायला लागलाया लई शाना झालासा काय?"[३] तिच्या पूर्ण समाजातूनच शिक्षण घेत असल्यामुळे विरोध होतो. "काय बया ही भिकाऱ्याचं सेमडी मेमडी पोरगी साळात बसायची का हे तर नवलच बया.मास्तर या पोरीला आमच्या पोरीच्या शेजारला बसू नका बया. नाहीतर हाकला त्या पोरीला."[४] जनाबाईचे शिक्षण समाजाच्या डोळ्यात खूपत होते पण रात्र झाली की दिवस उगवणारच. जनाबाईच्या मनात असलेली शिक्षणाची जिद्द आणि आपल्या बापाचा साथ.बापाने घेतलेली कणखर भूमिका त्यामुळे जनाबाईच्या मनात सोनकळी फुलत होती. आत्मकथनात जनाबाई एम्प्लॉयमेंट ऑफिस मधील घटना लिहितात. "माव्ह नाव नोंदवीत न्हाय ,तवार म्या हापिसातून उठत न्हाय...तुम्ही गोपाळ असला पर ही मुलगी तुमची मी समजू शकत नाही बाबा."[५] अशी अनेक प्रसंग भटक्या स्त्रीच्या जीवनाला तोडून मोडून टाकणारी आहेत.

कोल्हाटी समाजात स्त्री जीवनाची गत कुत्र्यांपेक्षाही वाईट आहे. स्त्रीच्या जन्म होताच आनंदाचे वातावरण निर्माण होते पण वास्तविक पाहता तिच्या जीवनाला शून्य किंमत आहे. 'कोल्हाट्याचं पोर' आत्मकथनाचे लेखक किशोर शांताबाई काळे यांच्या आईच्या वाट्याला एका 'रखेल'चे दुःख आले. या समाजात स्त्रीला नाचगाणी करून कुटुंबाचे उदरनिर्वाह करावे लागते. त्यांच्या वाट्याला नाचणारी बाई म्हणून आयुष्य भोगावे लागते तिचे जीवन म्हणजे एखाद्या मेणबत्ती प्रमाणे आहे. स्वतः जळावे आणि दुसऱ्याला प्रकाश द्यावा. समाज तिला तुच्छ नजरेने पाहतो. कोल्हाटी समाजात चिरा उतरविणे, दाडी लावणे इत्यादी प्रसंगातून सामाजिक जीवनाची जाणीव होते. "कृष्णा कोल्हाटी म्हणजे माझे पंजोबा यांनी जीजीच शरीर विकलं होतं... कोंडीबा आजोबांन तर आपल्या स्वतःच्या पोटच्या पोरीचं शरीर विकलं."[६] चिरा उतरवण्याच्या नावाखाली स्त्री विकण्याची प्रथा कोल्हाटी समाजात आहे असे स्त्रीचे अत्यंत खालच्या स्थरातील स्थान पाहायला मिळते. "कांबळे हा जातीनं महार होता. मांग- महार समाजाच्या व्यक्तीशी नाचणारीन राहणं हा गुन्हा आहे. असं कोल्हाटी समजतात. म्हणून कोल्हाटी समाजांन जातीच्या बाहेर काढलं. पण सोनारीच्या जत्रेमध्ये कुसुमच्या सर्व भावांना आणि बहिणीला देखील गुन्हेगार म्हणून पंचापुढे बोलावलं. त्यांना सांगितलं की तुम्ही जर आज कुसुमला घरात घेतलं तर तुम्हाला देखिल जातीच्या बाहेर टाकलं जाईल."[७] असा हा कोल्हाटी समाज आहे. चिता ही माणसाला मेल्यावर जाळते पण कोल्हाटी समाजातील स्त्रीचे जीवन जिवंतपणीच सतत जळणारे आहे.

'बेरड' मध्ये भीमराव गस्ती देवदासी, मुरळी या प्रथेचा परिचय करून देतात. "मामाची थोरली मुलगी सौदतीच्या यल्लमाला सोडली होती: त्यामुळे तिचे लगीन झालं नव्हतं आणि होणारही नव्हतं..."[८] या समाजामध्ये देवदासी प्रथा मोठ्या प्रमाणात आहे. आपल्या समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी बेरडकार प्रयत्न करतो तेव्हा लोकमन म्हणू लागले. "अहो आम्हाला याच समाजात राहायचं आहे. आज या देवदासी प्रथेविरुद्ध बोललो तर आमचेच हे लोक आम्हाला गाणत राहू देणार नाही आणि जगणे सुद्धा कठीण करून टाकतील."[९] देवदासी, मुरळी या प्रथा भटक्या विमुक्त समाजाच्या जीवनाचा एक भाग आहे.

पारधी समाजातील 'चोरटा'कार संतोष पवारांची आई अत्यंत कर्तबगार स्त्री आहे. लेकराच्या डोक्यावर बापाचे छत्र असून सुद्धा सर्व बापाचे कर्तव्य ही स्त्री आपल्या लेकरासाठी करते तिचे जीवन म्हणजे सुडावरच्या भाकरी सारखे आहे. "पारधी समाजात आपले नवरे जेलात गेले की पारध्याच्या काया एका पाठोपाठ एक असे अंगावरचं लुगडं बदलल्यागत नवरे बदलत हुंत्या आणि त्याच्या पैल्या नवऱ्याची लकर दारोदार भीक मागायची."[१०] दारोदार भीक मागून लेखकाची आई लेखकाला वाढविते.पारधी समाजातील स्त्रियांना देखील हापसीला हात लावून पाणी भरता येत नाही. स्त्री जीवनावर लादलेली समाज व्यवस्था गुलामगिरीच्या ओझ्याखाली स्त्री जीवनाला चिरडत आहे. धर्म, संस्कृती, प्रथा, परंपरांचा उदोउदो करणारा माणूस जन्मदात्री स्त्रीलाच नाचवतो आहे. पारध्याच्या बिराडातील माणूस बिराड तर बांधतो पण त्याला आपल्या स्त्रीच्या डोक्यावर देऊन स्वतः हात हलवत समोर चालतो. आपली अब्रू फाटक्या साडी चोळीमध्ये झाकून एका पतिव्रतेचे जीवन ती जगते. पण तिचा नवरा मिळेल तिथे तोंड मारत फिरतो आपल्या लेकरांना सांभाळीत जीवनातील बकालपण हसत हसत घालवणारी स्त्री स्वतः खंबीर बनते.

अठरापगड दारिद्र्य भोगावे लागणारी 'टाबरो'तील स्त्री मुलावर संस्कार टाकणारी आहे. "बेटा आरी जात येता चोपून चालावं, मागचा मोरचा इचार करून खावं, पोट भरलं नसल तर भरलं म्हणून उठाव पण कोणाची इज्जत घ्यायची नाही बघ."[११] अशा पद्धतीचे ऐतिहासिक संस्कृतीचे आणि सभ्यतेचे दस्तावेज भटक्या समाजातील जनजीवनाला समृद्ध प्राप्त करून देते. भटक्या विमुक्त समाजातील स्त्री एक शोषित, पिडित, दुर्बल, अबला स्त्री जरी दिसत असली तरी ती वेळप्रसंगी किंवा वेळोवेळी आपल्या अबलत्वाचे, दुर्बलतेचे, मढलेले कलंक पुसून काढते. बेलदार समाजातील स्त्री आपल्या पतीसोबत चिर फोडायला जाते. भिंताड उभी करायला मदत करणारी आहे. तरीही पुरुषी अहंकार तिच्या जीवनाला उध्वस्त करून देणारा आहे. "तुझ्या मायला म्या तुहया बायकु मनाव की गाढव. मला झोपवून समदी सागुती खाताव काय? मग तू मही बायको हाय, नवऱ्या सोडनू सागुती खाती. हयो पाप कुठं फेडशील ग. नवरा देव आसतु गं. अण देवाला फसवती. तुला पाप लागल. दुसऱ्या जन्मात देव तुला गुवातली आळी करंल.आळी व्होऊन हयो पाप तुला फेडावं लागल."[१२] जनावराच्या पातळीवरच्या व्यथा, वेदना भटक्या स्त्रियांच्या जीवनात दुहेरी स्वरूपात आलेली आहे. बाह्य समाजाने तर तिला छेडले पण स्वतःच्या घरात देखील तिला छळण्यात कोणत्याच प्रकारची कसर सोडलेली नाही. तिने आपले दुःख एक अबला म्हणून सतत सहन करीत राहावे या विचाराची मानसिकता मोठ्या प्रमाणात रूढ झालेली आहे. पाला पालावर अपमानित होणारा समाज आज स्त्री जीवनाच्या दुःखाकडे नजर फिरवताना देखील दिसत नाही या व्यथा वेदनेला आत्मकथनकारांनी आपल्या कलाकृतीतून जगासमोर आणून एक चांगले कार्य केलेले आहे. मत व मन

परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्त्री विषयी हिचा आदरभाव निर्माण होण्यासाठी याची मदत होईल. पशुतुल्य जीवन जगणाऱ्या स्त्री जीवनाला वाचा फोडण्याचे काम याद्वारे होत आहे.

बेरड, लामण, पारधी बंजारा, वडार, बेलदार अशा अठरापगड जाती जमातीतील स्त्री जीवनाचे दुःख आणि त्यांच्या कष्टमय व कर्तबगार जीवन संघर्षाची ओळख करून देणारे आहे. उचल्याकार लक्ष्मण गायकवाड स्त्री विक्री संबंध सांगतो, "आमच्या गावचा किसन पाटलानं आन दादानं निलंग्याकडं कर्नाटकाच्या भागात जाऊन आले. तिथे एक गडी बघीतला, आन एका दिवशी दादा, किसन पाटील नावाडी भाभीला घेऊन गेले. घरात मात्तर मी रडलो. बरं वाटू लागलं तितं तर सुखात राईल. दादा म्हनत व्हता, घर चांगल हाय, अखेर तिला घेऊन गेले. आन किसन पाटील, दादा माघारी आले. म्हाघारी आल्यास समजलं. त्या गड्याला पद्मिमीनी भाभीला दोनशे पन्नास रुपयाला इकलं. किसन पाटलानं शंभर रुपये दलाली घेतली. अन दादानं दीडशे रुपये आणले."[१३] स्त्रीच्या वाट्याला यापेक्षा मोठे दुःख कोणते असू शकते. स्त्रियांची देहविक्री केल्या जाते. स्त्रिया देवीला देवदासी, मुरळी म्हणून पुजल्या जातात. सर्वत्र स्त्री जीवनाचे होणारे शोषण या अनुषंगाने भटक्या विभक्तांच्या जीवनाला व समाज म्हणाला काळीमा फासणारी आहे. लक्ष्मण गायकवाड यांच्या मनात स्त्री विषमतेंचे पेरलेले बीज इयत्ता नववीत असतानाच्या "स्त्री शिक्षण योग्य आहे" म्हणून भाषण करण्याच्या इच्छेला कसे मोडतात या प्रसंगातून जाणीव करून देतात...." वर्गात स्वतःला शनी समजणारे मुलं व्हते. मला धमकी दिली अन् सांगितलं. बघ लक्ष्या, आमच्या मनासारखं भाषण कर... आणि माझ्या मनात नसतांना ही स्त्री- शिक्षणाच्या विरोधात भाषण केलो."[१४] स्त्री जीवन मुक्ती फक्त शिक्षणाने होऊ शकते, ही बाब लक्ष्मण गायकवाडला वर्ग नववीत असताना कळली असूनही बोलण्याचा अधिकार मात्र नाही. समाजातील विपरीत स्वरूपाचे मानस बाळगणारी मुले कशा पद्धतीने भीतीदायक वातावरण निर्माण करून मन वळून घेतात. स्त्री शोषणरुपी मानसिकता पाहायला मिळते. भटक्या विमुक्तांच्या स्त्री जीवनाचे विलक्षण व भीषण दर्शन एक वेगळ्याच प्रकारचे आहे. एखाद्या स्त्रीस बदचालीची ठरवून तिला उकळत्या तेलातून रुपया काढायचे फरमान पंच ठरवतात ती बाई जिवाचा धडा करून हात घालते आणि नंतर तो हात वांग्यासारखा टरारतो. भटक्या स्त्रीचे बाळंतपण रस्त्यावर आजही होत आहे. भर पावसात ओल्या बाळंतिणीला मंदिरातून हुसकावून लावल्या जाते. पारधी चोर म्हणून नवरा बायकोला सोडून रानावनातच राहतो. पोलीस त्याला सोडून विनाकारण स्त्रियांना सतावतो. तिची छेडखाणी काढतो. नवरा मिरासदारीने अंगावरील कापड बदलतो तसा बायका बदलतो. कोर्ट, कचेऱ्या, पोलीस, गावगुंड अशा विविध लोकांकडून होणारा त्रास स्त्री जीवनाच्या घवघवीत जखमेप्रमाणे आहेत.

**समारोप :**

भटक्या विमुक्त समाजातील स्त्री जीवन सुखापेक्षा दुःखच जास्त भोगणारे आहे. तिचे सौंदर्य म्हणजे तिची मळलेली काया आहे. तिने कधी नटू नये, थटू नये, आंघोळ करू नये, केस विचरू नये, गंध पावडर लावू नये स्मशानातील मढयासारखे बेचिराख जीवन जगावे अशी समजूत या समाजाची आहे. ज्या स्त्रिया समाजाविरुद्ध बंड करतात त्या समाजाच्या बाहेर टाकल्याचे दृश्य आहे.

या स्त्रियांचे जीवन म्हणजे अत्यंत संघर्षपूर्ण आणि वेदनादायक स्वरूपात दिसून येतात. या स्त्रियांना

गरिबी, अशिक्षण, सामाजिक उपेक्षा आणि पुरुषप्रधान व्यवस्थेचा दुहेरी त्रास सहन करावा लागतो. तरीही त्या आपल्या जीवनामध्ये खंबीरपणे संघर्ष करताना दिसतात आणि आपल्या कुटुंबाचा आधार बनतात. त्यांच्या जीवनात दुःख अन्याय आणि शोषण असले तरी त्यांच्यातील जिद्द स्वाभिमान आणि जगण्याची उमेद प्रेरणादायी स्वरूपाची आहे. त्यामुळे भटक्या स्त्रियांचे वास्तव समाजासमोर येते. आणि त्यांच्या प्रश्नासंबंधी संवेदनशीलता निर्माण होते.त्यामुळे या स्त्री प्रतिमा केवळ दुःखाचे चित्रण नसून संघर्ष, जिद्द आणि अस्तित्वाचा लढ्याचे प्रभावी दर्शन घडवतात.

**निष्कर्ष** :

1. भटक्या-विमुक्त स्त्रियांचे जीवन अत्यंत कठीण, असुरक्षित आहे आणि संघर्षपूर्ण असल्याचे आत्मकथनातून स्पष्ट होते.
2. स्त्रीला समाजाकडून आणि पुरुषप्रधान व्यवस्थेकडून दुहेरी शोषण सहन करावे लागते. जात, गरिबी आणि लिंग या तिन्ही स्तरांवर ती अन्याय सहन करतांना दिसते.
3. कुटुंबाचा सांभाळ करणारी, त्याग करणारी आणि कुटुंबाचे अस्तिव टिकवून ठेवणारी महत्त्वाची व्यक्ती म्हणून दिसते. तर अनेक आत्मकथनांमध्ये स्त्री ही कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी मेहनत करणारी आणि आर्थिक जबाबदारी उचलणारी असल्याचे दिसून येते.
4. संकटांना तोंड देत धैर्याने जीवन जगते, ही तिची प्रतिमा सकारात्मक आणि प्रेरणादायी स्वरूपाची आहे.
5. शिक्षणाच्या अभावामुळे स्त्री जीवन मर्यादित राहते, परंतु शिक्षणामुळे तिच्या जीवनात बदल घडू शकतो असेही दिसते.
6. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून घेतात आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवताना दिसतात.
7. पुरुषप्रधान संस्कृतीत तिला दुय्यम स्थान दिले जाते, तरीही ती स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करते.
8. भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनांमध्ये स्त्रीची प्रतिमा वास्तववादी, जिवंत आणि समाजाच्या कटू वास्तवाचे प्रतिबिंब दाखवणारी आहे. त्यामुळे समाज परिवर्तनासाठी प्रेरणा देणारी आहे.

**संदर्भ :**


- माने लक्ष्मण 'उपरा' ग्रंथाली प्रकाशन मुंबई पाचवी आवृ. २००० पृ.५४
- गिऱ्हे जनाबाई 'मरणकळा' अनिता गवळी प्रकाशन कोल्हापूर, प्र. आवृ.१९९२. पृ.३५
- तत्रैव पृ.४७
- त्रत्रैव पृ.२८
- तत्रैव पृ.४७
- काळे किशोर 'कोल्हाट्याचं पोरं' ग्रंथाली प्रकाशन मुंबई, प्र.आवृ.१९९९पृ.७
- त्रत्रैव पृ.३५

- गस्ती भीमराव 'बेरड' राजहंस प्रकाशन पुणे दु.आवृ.१९९२ पृ.२७
- तत्रैव पृ.१८१
- पवार संतोष 'चोरटा' शल्य मुनी श्रावक संघ प्रकाशन जालना, चौथी आवृ.२००९ पृ.१२
- राठोड शिवाजी धेनू, 'विमुक्तरंग' (टाबरो) गोरवानी प्रकाशन औरंगाबाद, प्र.आवृ. २००८ पृ. ८३
- अशोक पवार 'बिराड' मनोविकास प्रकाशन पुणे, पाचवी आवृ. २०१०,पृ.२
- गायकवाड लक्ष्मण 'उचल्या' श्री विद्या प्रकाशन पुणे, अकरावी आवृ. २०११.पृ.५३
- तत्रैव पृ.६६